नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 07/09/2020 (सोमवार)
(सकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 03 कि. मी. कळमणा फाटा येथे दिनांक 06/09/2020 चे 19.30 वा. दरम्यान उमरेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/ बी. एल – 1268 क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– 1) जितेन्द्र विश्वनाथ मेश्राम, वय 20 वर्ष, रा. भिवापुर, वार्ड क्र. 1 व 2) एम. एच.– 40/ बी. एल – 1268 क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीचा मालक नामे– अतुल धनराज चौधरी, वय 28 वर्ष, रा. नागतरोडी, ता. भिवापुर यांच्या ताब्यातुन 7(बैल) जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 7,87,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. अरविंद रतन चव्हाण, पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. उमरेड येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ) ए 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच सहकलम 109 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवा अरूण जयसिंगपुरे 8551862741 हे करीत आहे.





. अपघातात मृत्यु

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 17 कि.मी. अंतरावरील रायवाडी फाटा शिवार येथे दि. 06/09/2020 चे 13:30 वा. दरम्यान एमपी– 28/जी– 3711 क्रमांकाची अशोक लेलण्ड कपंनीचा दोस्त डान मालवाहु गाडीचा चालक आरोपी नामे– प्रकाश यादव, वय 29 वर्ष, रा. बोरीया ता.जि. छिंदवाडा(म. प्र) याने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–40/एव्ही 7276 क्रमांकाच्या मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार फिर्यादीचा भाचा नामे– लक्ष्मण रामकृष्ण कवरती, वय 30 वर्ष, रा. हेटी सुरला, ता सावनेर यांचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– व्यंकटराव रामाजी उईके, वय 60 वर्ष, रा. हेटी सुरला यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री हर्षल एकरे 7798386838 हे करीत आहे.

जबरी संभोग

पो.स्टे. पारशिवनी :– दि. 06/09/2020 वे 15.05 वा. ते 15.30 वा. सुमारास फिर्यादी यांची 6 वर्षीय मुलगी/पिडीत हि तिच्या आजोबाच्या घरासमोर खेळत होती. तेथुन तिच्या आईच्या मागे मागे येत असता आरोपी नामे– प्रमोद उर्फ गिडल्या वामनराव वांडे, वय 35 वर्ष, रा. गुडरीवांडे याने पीडितेला चॉकलेटचे आमिष दाखवुन गोठयात नेले व पिडीतेसोबत लैंगिक अत्याचार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 363, 376 (अ)(ब) भादंवि. 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. नयन आलुरकर रामटेक विभाग रामटेक या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर